**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

## विद्यापीठात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रारुप - २०१९' विषयावर २२ जुलै रोजी चर्चासत्राचे आयोजन

अमरावती.

भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाद्वारे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रारुप - २०१९' प्रसिद्ध करण्यात आले असून त्याचे अभिप्राय दिनांक ३१ जुलै, २०१९ पर्यंत मागविण्यात आले आहे. सदर प्रारुप भारतीय शिक्षण व्यवस्थेचे भवितव्य ठरविणारे असल्यामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २२ जुलै, २०१९ रोजी दुपारी १.०० वाजता विद्यापीठाच्या डॉ.के.जी. देशमुख सभागृहात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रारुप - २०१९' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर प्रारुपाच्या एकूण की पॉईंट मधील दुसरा घटक उच्च शिक्षण असा आहे. त्यामध्ये न्यु इन्स्टिट्युशनल आर्किटेक्चर, फोकस ऑन हाय क्वॉलिटी लिब्रल एज्युकेशन, क्रिएटींग अ कन्डक्टीव्ह लर्नींग एनव्हायर्मेन्ट, एनरजॅइस्ड, एन्गेज्ड ॲण्ड कॅपेबल फॅकल्टी, एम्पॉवर्ड गव्हर्नन्स ॲण्ड ॲटॉनॉमी, ट्रान्सफॉरमेशन ऑफ द रेग्युलॅरिटी सिस्टीम या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.

यामध्ये ज्यांना काही आपले मुल्यवान अभिप्राय वा सूचना द्यावयाच्या असतील, त्यांना दिनांक १८ जुलै, २०१९ पर्यंत विद्यापीठाकडे पाठवावयाच्या आहेत. तरी सदर चर्चासत्रात विद्यापीठाचे अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्वत परिषद सदस्य, सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी विकास विभागाचे उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे यांचेशी संपर्क साधता येईल. सदर चर्चासत्राचे थेट प्रक्षेपण विद्यापीठाच्या व्हर्चुअल सी फोर केंद्राद्वारे **https://livestream.com/sgbau** या लिंकवरुन करण्यात येणार आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १७/०७/२०१९.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी